

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र व मध्यवर्ती रोजगार कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी रोजगार महामेळाव्याकरिता आलेले उमेदवार. ( बी.डी.चेचर : सकाळ छायाचित्रसेवा )

# रोजगाराचा 'महामेळावा'

## 1698 उमेदवारांना नियुक्तीपत्रे; 17 हजारांवर झाल्या मुलाखती


**23,739** नोंदणी झालेले उमेदवार | **17,269** मुलाखती दिलेले | **122** कंपन्या | **9539** पदे

सकाळ वृत्तसेवा


कोल्हापूर, ता. १९ : नोकरी मिळविण्यासाठी तासन्‌तास रांगेत उभे राहून मुलाखती दिलेल्या १६९८ उमेदवारांना विविध कंपन्यांनी नियुक्तीपत्रे दिली, तर ३९३६ उमेदवारांना पुढील फेरीसाठी निवडले. वैद्यकीय, अभियांत्रिकी, विज्ञान, वाणिज्य, कला, तंत्रज्ञान शाखेतील विद्यार्थी कौशल्य व रोजगार महामेळाव्यात सहभागी झाले. शिवाजी विद्यापीठातील विविध अधिविभागात मुलाखती झाल्या. विविध कौशल्यांचे प्रशिक्षणही विद्यार्थ्यांना देण्यात आले. सुमारे २३ हजार उमेदवार मेळाव्यात सहभागी झाल्याचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांनी सांगितले. विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकासकेंद्र व मध्यवर्ती रोजगारकक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने महामेळाव्याचे आयोजन केले होते.

ऑनलाईन व ऑफलाईन स्वरूपात उमेदवारांनी महामेळाव्यासाठी नोंदणी केली होती. ते आज सकाळीच विद्यापीठात आले होते. नोकरी मिळविण्याची उत्सुकता प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसत होती. कोल्हापूर, सांगली, सातारा, जिल्ह्यांतील उमेदवार मुलाखतीसाठी आले होते. रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, वि. स. खांडेकर भाषा भवन, भौतिकशास्त्र, गणित, मानव्यशास्त्र, तंत्रज्ञान व भूगोल अधिविभाग उमेदवारांच्या गर्दीने फुलला होता. ही गर्दी लक्षात घेता कंपन्यांच्या प्रतिनिधींनी जास्तीत जास्त पाच मिनिटांत उमेदवारांच्या मुलाखती आटोपल्या. मुलाखतीनंतर नोकरी मिळेल का, याची चिंता उमेदवारांत दिसत होती.


लोककला केंद्रात पन्नास कौशल्यांचे प्रशिक्षण उमेदवारांना देण्यात आले. त्यात साडेसहा हजार उमेदवारांनी सहभाग नोंदवला. तत्पूर्वी, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते फीत कापून मेळाव्याचे उद्‌घाटन करण्यात आले. या वेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे उपस्थित होते.



**सुमारे तेवीस हजार उमेदवारांनी महामेळाव्यासाठी नोंदणी केली होती. आज कंपन्यांनी विविध पदांसाठी मुलाखती घेतल्या. ग्रामीण भागातील उमेदवार मुलाखतीसाठी आले होते. मुलाखतीबरोबरच कौशल्ये आत्मसात केली.**
**- डॉ. ए. एम. गुरव**
(समन्वयक, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र)



**शिवाजी विद्यापीठाने रोजगार मिळवून देण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा आहे. नोकरी मिळावी, अशी सुशिक्षित बेरोजगारांना अपेक्षा आहे. विविध कंपन्यांनी विद्यापीठात येऊन आज उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. त्यांना नोकरी मिळाल्यास त्यांच्यातील अस्वस्थता दूर होईल.**
**- सुमित महादेव कोळेकर**
(बांबवडे)



**मी विमा प्रतिनिधी पदासाठी मुलाखत दिली. दोन ते अडीच मिनिटांत माझी मुलाखत झाली. विमा सुरक्षिततेचे फायदे काय, याविषयी मला विचारणा झाली. या मुलाखतीने माझ्यातील आत्मविश्वास उंचावला आहे.**
**- पूजा राजेंद्र घाडगे**
(सातारा)

20 MAY 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रोजगार मेळाव्यात २३ हजार उमेदवारांच्या मुलाखती

## विद्यापीठातील ५० कौशल्य कक्षात ६ हजार ५०० उमेदवारांना मार्गदर्शन : इच्छुक उमेदवारांचा अभूतपूर्व प्रतिसाद

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र आणि मध्यवर्ती रोजगार कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या रोजगार व कौशल्य महामेळाव्यास कंपन्या व इच्छुक उमेदवारांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. साडेनऊ हजारांहून अधिक रोजगार संधींसाठी सुमारे २३ हजार उमेदवारांनी विद्यापीठाच्या परिसरात उपस्थिती दर्शविली.






**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित रोजगार व कौशल्य मेळाव्याचे उद्घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, महेश काकडे, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. ए. एस. गुरव, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. पी. डी. राऊत आदी. दुसऱ्या छायाचित्रात रोजगार व कौशल्य मेळाव्यात नावनोंदणी करताना उमेदवार.**

विद्यापीठातील लोककला केंद्रातील आयोजित रोजगार व कौशल्य महामेळाव्याचे उद्घाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक व अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, डॉ. पी. डी. राऊत; डॉ. पी. एस. पाटील, डॉ. भारती पाटील, मध्यवर्ती रोजगार कक्षाचे समन्वयक डॉ. गजानन राशिनकर यांच्यासह अधिसभा, व्यवस्थापन परिषद व विद्या परिषदेचे सदस्य उपस्थित होते.

विद्यापीठात माहिती तंत्रज्ञान, बी. पी. ओ., सेवा क्षेत्र, एच. आर., विपणन, विक्री, बँकिंग, फायनान्स विमा, अन्य वित्तीय संस्था, वस्त्रोद्योग, टेलिकॉम, अभियांत्रिकी आदींसह रिक्रुटिंग क्षेत्रांत काम करणाऱ्या सुमारे १२२ कंपन्यांनी विविध ९,५३९ पदांसाठी उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. काही कंपन्यांनी लेखी तरू ऑनलाईन परीक्षाही घेतल्या. या पदांसाठी यापूर्वीच दहा हजारांहून अधिक उमेदवारांनी ऑनलाइन व ऑफलाईन स्वरुपात नावनोंदणी केलेली होती. शनिवारी स्पॉट नावनोंदणीसाठी उमेदवारांच्या रांगा लागल्या होत्या. विद्यापीठ प्रशासनाने सुमारे ५० नोंदणी कक्षाची व्यवस्था केली होती.

### कडक बंदोबस्त

विद्यापीठाचा सुरक्षा विभाग तसेच कोल्हापूर जिल्हा पोलीस प्रशासनाने कडक बंदोबस्त ठेवला होता. अ अग्निशमन बंब व सुसज्ज अँब्युलन्स वाहन यांचीही स्थानिक प्रशासनाच्या वतीने व्यवस्था करण्यात आली. पिण्याच्या पाण्याची ठिकठिकाणी व्यवस्था केली होती. उपस्थित उमेदवारांनीही स्वयंशिस्तीचे दर्शन घडवून शांततेने व शिस्तबद्ध पद्धतीने मुलाखती दिल्या.

20 MAY 2018

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या रोजगार महामेळाव्यास प्रतिसाद

## साडेनऊ हजार रोजगार संधींसाठी २३ हजार उमेदवारांचा सहभाग

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
शिवाजी विद्यापीठाचे कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र आणि मध्यवर्ती रोजगार कक्ष व महाराष्ट्र शासनाचा विद्यापीठ कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या रोजगार व कौशल्य महामेळाव्यास रोजगार प्रदाते, कौशल्य प्रदाते आणि इच्छुक उमेदवारांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. साडेनऊ हजारांहून अधिक रोजगार संधींसाठी सुमारे २३ हजार उमेदवार विद्यापीठ परिसरात उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते रोजगार व कौशल्य महामेळाव्याचे फीत कापून उद्घाटन करण्यात आले. कुलगुरू डॉ. शिंदे यांनी लोककला केंद्रातील विविध कौशल्य प्रदान स्टॉल्सची फिरून पाहणी केली. नोंदणीसाठी उपस्थित असलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींशीही त्यांनी संवाद साधला.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात रोजगार व कौशल्य महामेळाव्याचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत डॉ. डी. टी. शिर्के, डी. आर. मोरे, ए. एम. गुरव, आर. व्ही. गुरव आदी.**

विद्यापीठात माहिती तंत्रज्ञान, बीपीओ, सेवा क्षेत्र, एचआर, विपणन, विक्री, बँकिंग, फायनान्स विमा, अन्य वित्तीय संस्था, वस्त्रोद्योग, टेलिकॉम, अभियांत्रिकी आदींसह रिक्रुटिंगच्या क्षेत्रात काम करणाऱ्या सुमारे १२२ कंपन्यांनी विविध ९,५३९ पदांसाठी उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. काही कंपन्यांनी लेखी, ऑनलाईन परीक्षाही घेतल्या. या पदांसाठी यापूर्वीच दहा हजारांहून अधिक उमेदवारांनी ऑनलाईन व ऑफलाईन स्वरूपात नावनोंदणी केलेली होती. सकाळपासूनच विद्यापीठाच्या लोककला केंद्रात स्पॉट नोंदणीसाठी उमेदवारांच्या रांगा लागल्या होत्या. विद्यापीठ प्रशासनाने सुमारे ५० नोंदणी कक्ष सुरू केले होते. मेळाव्यासाठी त्यामुळे एकूण २३ हजार ७६९ उमेदवारांनी नोंदणी केली. रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, वनस्पतीशास्त्र, भूगोल, मानव्यविद्या इमारत, वि. स. खांडेकर भाषा भवन, गणित आणि तंत्रज्ञान अशा नऊ विविध अधिविभागांमध्ये विविध कंपन्यांसाठी क्षेत्रनिहाय मुलाखतींची व्यवस्था करण्यात आल्यामुळे एकाच ठिकाणी गर्दी न होता रोजगार मेळाव्याची प्रक्रिया सुरळीतपणे पार पडली. लोककला केंद्रात तीस विविध संस्थांनी स्टॉल्स उभारून त्या ठिकाणी विविध ५० कौशल्ये सुमारे ६५०० उमेदवारांना मोफत प्रदान केली.

उद्घाटनप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक व अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. भारती पाटील, मध्यवर्ती रोजगार कक्षाचे समन्वयक डॉ. गजानन राशिनकर यांच्यासह अधिसभा, व्यवस्थापन परिषद व विद्या परिषदेचे सदस्य उपस्थित होते.

20 MAY 2018
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात महारोजगार मेळाव्यास प्रचंड प्रतिसाद

# साडेपाच हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना नोकरी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

एकाचवेळी ५ हजार ६३४ विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी शनिवारी शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित महारोजगार मेळाव्यात उपलब्ध झाल्या. देशभरातील नामवंत १२२ कंपन्यांनी या मेळाव्यात सहभाग घेतला. या मेळाव्यासाठी २३ हजार विद्यार्थ्यांनी उपस्थिती लावून उच्चांक निर्माण केला. यशस्वी मुलाखत झालेल्या विद्यार्थ्यांनी नोकरी मिळाल्याच्या समाधानाने मित्रांसमवेत कॅम्पस्मध्ये आनंदोत्सव साजरा केला. या मेळाव्यास मुलींची संख्या लक्षणीय दिसून आली.

- २३ हजारांची उपस्थिती कॅम्पस्मध्ये आनंदोत्सव
- मुलींची संख्या लक्षणीय

शिवाजी विद्यापीठाचे कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र आणि मध्यवर्ती रोजगार कक्ष व महाराष्ट्र शासनाचा विद्यापीठ कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने हा महारोजगार मेळावा आयोजित केला होता.

**असा झाला महारोजगार मेळावा..**

विद्यापीठात आज माहिती तंत्रज्ञान, बी.पी.ओ., सेवा क्षेत्र, एच.आर., विपणन, विक्री, बँकिंग, फायनान्स विमा, विविध वित्तीय संस्था, वस्त्रोद्योग, टेलिकॉम, अभियांत्रिकी आदींसह रिक्रूटिंगच्या क्षेत्रात काम करणाऱ्या सुमारे १२२ कंपन्यांनी विविध पदांसाठी उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. काही कंपन्यांनी लेखी तसेच ऑनलाईन परीक्षाही घेतल्या. या पदांसाठी यापूर्वीच दहा हजारांहून अधिक उमेदवारांनी ऑनलाईन व ऑफलाईन स्वरूपात नावनोंदणी केलेली होती.

**17,269**
विद्यार्थ्यांची मुलाखत

**3,936**
उमेदवारांची शॉर्टलिस्ट

**1,698**
जाग्यावर नियुक्तीपत्र

**विद्यार्थ्यांच्या गर्दीचा उच्चांक**

शनिवारी सकाळपासूनच विद्यापीठाच्या लोककला केंद्रात स्पॉट नोंदणीसाठी उमेदवारांच्या रांग लागल्या होत्या. पान ८ ▶

(पान १ वरून) त्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने सुमारे ५० नोंदणी कक्ष सुरू केले होते. त्यामुळे उमेदवारांनानोंदणीकरणेसोयीचेझाले. या मेळाव्यासाठी एकूण २३ हजार ७६९ उमेदवारांनी नोंदणी केली. आधी नोंदणी केलेल्या उमेदवारांना विविध कंपन्या व त्यांच्या मुलाखत कक्षाची माहिती पत्रकाद्वारे तसेच ठिकठिकाणी माहिती फलकांद्वारे उपलब्ध करून दिल्यामुळे त्यांना थेट मुलाखतीच्या ठिकाणी जाता आले. रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, वनस्पतीशास्त्र, भूगोल, मानव्यविद्या इमारत, वि. स. खांडेकर भाषा भवन, गणित आणि तंत्रज्ञान अशा नऊ विविध अधिविभागांमध्ये विविध कंपन्यांसाठी क्षेत्रनिहाय मुलाखतींची व्यवस्था करण्यात आल्यामुळे एकाच ठिकाणी गर्दी न होता रोजगार मेळाव्याची प्रक्रिया सुरळीतपणे पार पडली. त्याचप्रमाणे लोककला केंद्रात तीस विविध संस्थांनी स्टॉल्स उभारून त्या ठिकाणी विविध ५० कौशल्ये सुमारे ६५०० उमेदवारांना मोफत प्रदान केली.



शिवाजी विद्यापीठात शनिवारी झालेल्या महारोजगार मेळाव्यास ठिकठिकाणच्या विभागांमध्ये विद्यार्थ्यांची अशी मोठी गर्दी होती. (छाया : पप्पू अत्तार)

## शिस्तबद्धतेचे दर्शन

*विद्यापीठाचा सुरक्षा विभाग तसेच कोल्हापूर जिल्हा पोलिस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवल्यामुळे तसेच पार्किंगची स्वतंत्र व्यवस्था केल्यामुळे वाहतूक समस्या उद्‌भवली नाही. अग्निशमन बंब व प्राथमिक आरोग्य सुविधांनी सुसज्ज ॲम्ब्युलन्सचीही स्थानिक प्रशासनाच्या वतीने व्यवस्था करण्यात आली. विद्यापीठाने उमेदवारांना पिण्याच्या पाण्याची ठिकठिकाणी व्यवस्था केली होती. उपस्थित उमेदवारांनीही स्वयंशिस्तीचे दर्शन घडवून अत्यंत शांततेने व शिस्तबद्ध पद्धतीने मुलाखती दिल्या.*

सकाळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते रोजगार व कौशल्य महामेळाव्याचे फीत कापून उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक व अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव आदींसह अधिसभा, व्यवस्थापन परिषद व विद्या परिषदेचे सदस्य उपस्थित होते.

उद्‌घाटनानंतर कुलगुरू डॉ. शिंदे यांनी लोककला केंद्रातील विविध कौशल्य प्रदान स्टॉल्सची फिरून पाहणी केली. यावेळी नोंदणीसाठी उपस्थित असलेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींशीही त्यांनी संवाद साधला. यानंतर मुलाखतीची व्यवस्था करण्यात आलेल्या विविध अधिविभागांना कुलगुरू डॉ. शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांनी भेट देऊन त्या ठिकाणी करण्यात आलेल्या व्यवस्थेची पाहणी केली. रोजगार प्रदात्या कंपन्यांच्या प्रतिनिधींचे स्वागत केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 MAY 2018 पुढारी



कोल्हापूर : दैनिक 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव व व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव यांच्याशी शैक्षणिक विषयांवर चर्चा करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. (छाया : पप्पू अत्तार)

# डॉ. प्रतापसिंह जाधव यांच्याशी कुलगुरूंची चर्चा

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी शनिवारी दैनिक 'पुढारी'च्या मुख्य कार्यालयास भेट देऊन 'पुढारी'चे संस्थापक-संपादक पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव यांच्या पुतळ्यास अभिवादन केले.

कुलगुरू डॉ. शिंदे दुपारी नवी दिल्ली येथे होणाऱ्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) बैठकीस रवाना झाले. तत्पूर्वी, त्यांनी 'पुढारी' कार्यालयास भेट दिली. यानंतर कुलगुरू डॉ. शिंदे यांनी मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव व व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव यांची भेट घेऊन शैक्षणिक विषयांवर चर्चा केली.

जनसंपर्क कक्ष
विद्यापीठ, कोल्हापूर

20 MAY 2018 पुढारी

# 'पुढारी'कार ग. गो. जाधव स्मृतिदिनानिमित्त डॉ. काकोडकर यांचे आज व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

दै. 'पुढारी'चे संस्थापक संपादक पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव यांच्या ३१ व्या स्मृतिदिनानिमित्त रविवारी (दि. २०) जागतिक कीर्तीचे अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांचे व्याख्यान आयोजित केले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या वतीने 'पुढारी'कार पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमाले अंतर्गत शाहू स्मारक भवन येथे रविवारी सायंकाळी पाच वाजता व्याख्यान होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे राहणार आहेत.

'पुढारी'कार डॉ. ग. गो. जाधव यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या वतीने दरवर्षी व्याख्यानमालेचे आयोजन केले जाते. या व्याख्यानमालेत विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ, विचारवंत, अभ्यासक आदींनी विविध विषयांवर आपले विचार मांडले आहेत. रविवारी डॉ. काकोडकर 'शाश्वत ऊर्जा सुरक्षा, आव्हाने व पर्याय' या विषयावर या व्याख्यानमालेतील ३० वे पुष्प गुंफणार आहेत. रविवारी सायंकाळी पाच वाजता होणारे व्याख्यान वेळेवर सुरू होणार आहे. त्यामुळे वेळेपूर्वी १५ मिनिटे आधी शाहू स्मारक भवनाच्या सभागृहात उपस्थित रहावे, असे आवाहन दैनिक 'पुढारी' परिवार व शिवाजी विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे.

**स्मृतिदिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन**

'पुढारीकार' कै. डॉ. ग.गो.जाधव यांच्या स्मृतिदिनानिमित्त रविवारी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. जाधव यांच्या कार्याचे स्मरण करत शहरात स्केटिंग रॅली काढण्यात येणार आहे. रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले आहे. यासह प्रेरणाज्योत, फळेवाटप आदी कार्यक्रमांद्वारे डॉ. ग. गो. जाधव यांना आदरांजली वाहण्यात येणार आहे. डॉ. काकोडकर यांचे भाषण विद्यार्थी, संशोधक, उद्योजक आदींसह सर्वसामान्यांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे. हे भाषण दैनिक 'पुढारी' ऑनलाईनच्या www.facebook.com/pudharionline या पेजवर पाहता येणार आहे.

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 MAY 2018

# 'यिन'चे आजपासून समर यूथ समिट

## यशोलौकिकाच्या शिलेदारांशी थेट संवादाची संधी

SPECTRUM ACADEMY Presents
YOUNG INSPIRATORS NETWORK
In association with JJMCOE
YIN SUMMER YOUTH SUMMIT'18
Powered by # HASHTAG MENS WEAR



डी. टी. शिर्के | सुनील पाटील | विजय मगदूम | जितेंद्र जोशी | प्रियंका यादव | समृद्धी जाधव | वसंत हंकारे

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १९ : डिलिव्हरिंग चेंज फाउंडेशनच्या 'यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क' (यिन) या युवा व्यासपीठाने आयोजित केलेल्या 'यिन समर यूथ समिट'ला उद्या (ता. २०) प्रारंभ होणार आहे. समाज व देशासाठी काही तरी करण्याची ऊर्मी असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही परिषद होईल. दरम्यान, युवकांना उद्योग, राजकारण, टीम बिल्डिंग स्टार्टअप, खेळ, नवीन तंत्रज्ञान क्षेत्रांमध्ये यशस्वी ठरलेल्या व्यक्तींबरोबर थेट संवाद साधण्याची संधी देताना भविष्यात शैक्षणिक संधीचा वेध या परिषदेतून घेतला जाणार आहे.

### अधिक माहितीसाठी संपर्क

- कोल्हापूर : सूरज चव्हाण (८८५६०५२५५६), अवधूत गायकवाड (९९७५१३१२७०)
- सांगली : विवेक पवार (७७२२०७३०४४)

दरम्यान, शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते दुपारी बाराला परिषदेचे उद्‍घाटन होईल. स्पेक्ट्रम ॲकॅडमीचे संचालक सुनील पाटील, जे. जे. मगदूम ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. विजय मगदूम यांची प्रमुख उपस्थिती असेल.

तरुण पिढीला शैक्षणिक, सामाजिक व व्यावसायिक विकासावर लक्ष केंद्रित करताना समाज व देशासाठी रचनात्मक काम उभे करण्यास प्रेरणा मिळावी, हा या परिषदेचा मुख्य हेतू आहे. परिषदेची उत्सुकता आता शिगेला पोचली असून, हॉटेल पॅव्हेलियनच्या मधुसूदन हॉलमध्ये ही परिषद होणार आहे. स्पेक्ट्रम ॲकॅडमी या परिषदेसाठी मुख्य प्रायोजक आहेत. पॉवर्ड बाय हॅशटॅग क्लोदिंग असणाऱ्या या परिषदांसाठी पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे पिंपरी-चिंचवड कॉलेज ऑफ कंपनीज, सुहाना मसालेवाले, अभी ग्रुप ऑफ कंपनीज, जे. जे. मगदूम ट्रस्ट (जयसिंगपूर) हे सहप्रायोजक आहेत.

### आज परिषदेत...

- सकाळी साडेदहा : महाराष्ट्र यूथ आयकॉन पुरस्काराने सन्मानित प्रियंका यादव यांचे मार्गदर्शन सत्र.
- दुपारी १२ : परिषदेचा उद्‍घाटन सोहळा.
- दुपारी २ : अभी ग्रुप ऑफ कंपनीजचे संचालक जितेंद्र जोशी यांच्याशी संवाद.
- दुपारी ४ : अभिनेत्री समृद्धी जाधव यांचे मार्गदर्शन सत्र.
- सायंकाळी ५ : प्रसिद्ध वक्ते वसंत हंकारे यांच्याशी संवाद.

### स्पॉट रजिस्ट्रेशन

- परिषदेसाठी अजूनही ज्यांनी नोंदणी केलेली नाही ते विद्यार्थी परिषदेच्या ठिकाणी येऊन नोंदणी करू शकतात.
- स्थळ : हॉटेल पॅव्हेलियन मधुसूदन हॉल, बसंत-बहार रोड, कोल्हापूर.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 MAY 2018
तरुण भारत

# नऊ सामंजस्य करार करण्यास व्यवस्थापन परिषदेत मान्यता

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात शनिवारी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विविध नऊ शैक्षणिक संस्थांबरोबर सामंजस्य करार करण्यास मान्यता दिली. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे तर सचिवपदी प्र–कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते.

शिवाजी युनिव्हर्सिटी कोल्हापूर अॅन्ड समृध्दी टीबीआय डिपार्टमेंट ऑफ केमिस्ट्री शिवाजी युनिवर्सिटी, महाराष्ट्र इंडिया अॅन्ड नॅशनल सेंटर फॉर नॅनोसायन्सेस अॅन्ड नॅनोटेक्नोलॉजी, युनिव्हर्सिटी ऑफ मुंबईबरोबर सामंजस्य करार करण्यास मान्यता. सन २०१८–१९ राष्ट्रीय कव्वाली स्पर्धा शिवाजी विद्यापीठात आयोजित करण्यास मान्यता देण्यात आली. शिवाजी विद्यापीठ आणि एनरजेटिक कन्सल्टिंग प्रायव्हेट लि. ठाणे यांच्यात सामंजस्य करार करण्यास मान्यता. शिवाजी विद्यापीठ व थिया न्यू कन्सलटन्सी एलएलपी, घणसोली,



नवी मुंबई यांच्यात सामंजस्य करार करण्यास मान्यता. शिवाजी विद्यापीठ आणि शिवोम मेब्रेन सिस्टीम्स, कबनूर, इचलकरंजी यांच्याशी सामंजस्य करार करण्यास मान्यता. शिवाजी विद्यापीठ आणि इन्स्टा व्हिजन लॅबोरेटरीज अॅन्ड सर्व्हिसेस सातारा यांच्यात सामंजस्य करार करण्यास मान्यता. शिवाजी विद्यापीठ आणि एबीएन एन्टरप्रायजेस, उचगाव, (कोल्हापूर) यांच्यात सामंजस्य करार, शिवाजी विद्यापीठ आणि मंगळवेढा माईन्स प्रायव्हेट लि. मंगळवेढा ( जि. सोलापूर) यांच्यात करार करण्यास मान्यता. शिवाजी विद्यापीठ आणि आरसीएफ लिमिटेड, थल युनिट, अलिबाग सामंजस्य करार करण्यास मान्यता देण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 MAY 2018
सकाळ

## विद्यापीठात सामंजस्य करार

कोल्हापूर : विविध नऊ शैक्षणिक संस्थांबरोबर सामंजस्य करार करण्यास शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेत आज मान्यता देण्यात आली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या वेळी विद्यापीठात यंदा राष्ट्रीय कव्वाली स्पर्धा आयोजित करण्यासही मान्यता देण्यात आली. या वेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 MAY 2018
पुढारी

# विद्यापीठात सामंजस्य करारांना मान्यता

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या शनिवारी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विविध नऊ शैक्षणिक संस्थांसमवेत सामंजस्य करारास मान्यता देण्यात आली. तसेच यंदा राष्ट्रीय कव्वाली स्पर्धा विद्यापीठात आयोजित करण्यास मंजुरी देण्यात आली. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. सचिवपदी प्र-कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते.

जनसंपर्क कक्ष
20 MAY 2018 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाची प्रतिष्ठा वाढवा

## प्रा. जे. एफ. पाटील : रवळनाथतर्फे सत्कार सोहळा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

विद्यार्थ्यांचे कल्याण, संशोधन आणि अंगभूत कौशल्याला कसा वाव याचा विचार विद्यापीठाने करावा, तर व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी राज्यात विद्यापीठाची प्रतिष्ठा वाढवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करावा, असे आवाहन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. जे. एफ. पाटील यांनी केले.

रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीच्या येथील शाखेत आयोजित सत्कार समारंभात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या नूतन सदस्या प्रा. डॉ.भारती पाटील व प्रा. डॉ. आर. जी. कोरबू यांचा सत्कार करण्यात आला.



कोल्हापूर : रवळनाथ संस्थेच्या वतीने प्रा. डॉ. आर. जी. कोरबू यांचा सत्कार करताना प्रा. डॉ. जे. एफ. पाटील. सोबत इतर मान्यवर.

ते म्हणाले, गेल्या दोन दशकात गृहबांधणी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या रवळनाथचे बँकेत रूपांतर व्हावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. सार्वजनिक क्षेत्रात काम करणाऱ्या चांगल्या माणसाला, चांगल्या विचाराला नक्कीच चांगले फळ मिळते. अंगभूत आक्रमकतेला अभ्यासाची जोड देऊन व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी विद्यापीठाच्या नावलौकिकासाठी झटावे, असे आवाहनही प्रा. डॉ. पाटील यांनी केले. यावेळी महावीर कापसे, प्राचार्य डॉ. एच. व्ही. देशपांडे, अमृत सुतार, विजय हारगुडे, भास्कर सांगावकर, पंकज कुंभार, प्रा. प्रकाश कुंभार यांच्यासह सभासदही उपस्थित होते. स्वागत शाखा चेअरमन प्रा. आर. एस. पाटील यांनी केले. प्रास्ताविक संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी केले. सूत्रसंचालन किरण पाटील यांनी, तर आभार प्रा. डॉ. रवींद्र पोर्लेकर यांनी मानले.

लोकमत



शिवाजी विद्यापीठात आयोजित रोजगार व कौशल्य महामेळाव्यात स्पॉट रजिस्ट्रेशन करताना झालेली गर्दी. वृत्त/४

Hello Kolhapur
Page No. 1 May 20, 2018
Powered by: erelego.com

लोकमत

## शिवाजी विद्यापीठात महामेळावा : १२२ कंपन्यांचा सहभाग; विविध ९,५३९ पदे

# साडेपाच हजार उमेदवारांना रोजगार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाचे कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र आणि मध्यवर्ती रोजगार कक्ष यांच्यातर्फे आयोजित रोजगार व कौशल्य महामेळाव्यास मोठा प्रतिसाद लाभला. साडेनऊ हजारांहून अधिक रोजगार संधींसाठी सुमारे २३ हजार उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यांपैकी सायंकाळपर्यंत १७ हजार २६९ उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. त्यामधून ३९३६ उमेदवारांना विविध कंपन्यांनी पुढील फेरीसाठी निवडले आहे, तर १६९८ उमेदवारांना नियुक्तीपत्र प्रदान केले. अशा ५६३४ उमेदवारांना रोजगार मिळाला.

शिवाजी विद्यापीठ परिसरात शनिवारी सकाळी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते रोजगार व कौशल्य महामेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. सकाळपासूनच विद्यापीठाच्या लोककला केंद्रात स्पॉट नोंदणीसाठी उमेदवारांच्या रांगा लागल्या होत्या. त्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने सुमारे ५० नोंदणी कक्ष सुरू केले होते. यापूर्वीच दहा हजारांहून अधिक उमेदवारांनी ऑनलाइन व ऑफलाईन स्वरुपात नावनोंदणी केलेली होती. या मेळाव्यासाठी त्यामुळे एकूण २३ हजार ७६९ उमेदवारांनी नोंदणी केली. आधी नोंदणी केलेल्या उमेदवारांना विविध कंपन्या व त्यांच्या मुलाखत कक्षांची माहिती पत्रकाद्वारे तसेच ठिकठिकाणी माहिती फलकांद्वारे उपलब्ध करुन दिल्यामुळे त्यांना थेट मुलाखतीच्या ठिकाणी जाता आले.

उद्घाटनप्रसंगी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक व अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. भारती पाटील, मध्यवर्ती रोजगार कक्षाचे समन्वयक डॉ. गजानन राशिनकर यांच्यासह अधिसभा, व्यवस्थापन परिषद व विद्या परिषदेचे सदस्य उपस्थित होते.

### यात्रेचे स्वरुप

- शिवाजी विद्यापीठाचे मुख्य प्रवेशद्वार व परिसरात उमेदवारांनी मोठी गर्दी केल्याने परिसराला यात्रेचे स्वरुप आले होते.
- विद्यापीठाचा सुरक्षा विभाग तसेच कोल्हापूर जिल्हा पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता.
- यासह अग्निशमन बंब व प्राथमिक आरोग्य सुविधांनी सुसज्ज रुग्णवाहिका यांचीही स्थानिक प्रशासनाच्या वतीने व्यवस्था करण्यात आली.



शिवाजी विद्यापीठात शनिवारी आयोजित रोजगार व कौशल्य महामेळाव्याला मोठा प्रतिसाद लाभला. या मेळाव्यामध्ये विविध कंपन्यांच्या अधिकाऱ्यांनी उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या.

### नऊ ठिकाणी मुलाखती

- रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, वनस्पतीशास्त्र, भूगोल, मानव्यविद्या इमारत, वि. स. खांडेकर भाषाभवन, गणित आणि तंत्रज्ञान अशा नऊ विविध अधिविभागांमध्ये विविध कंपन्यांसाठी क्षेत्रनिहाय मुलाखतींची व्यवस्था करण्यात आली होती.
- लोककला केंद्रात ३० विविध संस्थांनी स्टॉल्स उभारुन त्या ठिकाणी विविध ५० कौशल्यांची मोफत माहिती देण्यात येत होती.

### लेखी, ऑनलाईन परीक्षा

विद्यापीठात आज माहिती तंत्रज्ञान, बी.पी.ओ., सेवाक्षेत्र, एच.आर., विपणन, विक्री, बँकिंग, फायनान्स, विमा, अन्य वित्तीय संस्था, वस्त्रोद्योग, टेलिकॉम, अभियांत्रिकी, आदींसह रिक्रुटिंगच्या क्षेत्रात काम करणाऱ्या सुमारे १२२ कंपन्यांनी विविध ९,५३९ पदांसाठी उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. काही कंपन्यांनी लेखी तसेच ऑनलाईन परीक्षाही घेतल्या.

"विद्यापीठात सुमारे १२२ कंपन्यांनी विविध ९,५३९ पदांसाठी उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. एकूण २३ हजार ७३९ उमेदवारांनी या मेळाव्यासाठी नोंदणी केली होती. त्यांच्यापैकी १७ हजार २६९ उमेदवारांच्या मुलाखती होऊन यामधून साडेपाच हजार उमेदवारांना रोजगार मिळाला आहे. लोककला केंद्रात ६५०० उमेदवारांना मोफत कौशल्य प्रशिक्षणाची माहिती देण्यात आली.

**- डॉ. ए. एम. गुरव**, समन्वयक, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र



महारोजगार मेळाव्यात नावनोंदणी करताना उमेदवार.



रांगेत उभा राहिलेले असताना मुलाखतीची तयारी करताना.



उमेदवारांची मुलाखत घेताना विविध कंपन्यांचे प्रतिनिधी.

# ५५०० उमेदवारांना नोकरीची संधी

## विद्यापीठातील महारोजगार मेळाव्यास प्रतिसाद; १७ हजारांवर उमेदवारांनी दिली मुलाखत

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

चेहऱ्यावर हलकासा तणाव, हातात प्रमाणपत्र असलेल्या फाइल्स, फॉर्मल कपड्यांच्या वेशभूषेसह मुलाखतीत काय प्रश्न विचारले जातील?, नोकरी कुठे मिळेल, पगार किती असेल? आपली निवड होईल का? अशा असंख्य प्रश्नांसह साडेनऊ हजारांहून अधिक रोजगार संधींसाठी सुमारे १७ हजार २६९ उमेदवारांनी मुलाखत दिली. यातील साडेपाच हजारांहून अधिक जणांना नोकरीची संधी मिळाली. शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र आणि मध्यवर्ती रोजगार कक्ष यांच्यातर्फे शनिवारी महारोजगार मेळाव्याचे आयोजन केले होते. विद्यापीठ परिसराला रोजगार मेळाव्याच्या निमित्ताने यात्रेचे स्वरूप आले होते.



शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व विकास केंद्राच्या वतीने शनिवारी विद्यापीठात महारोजगार मेळावा घेण्यात आला. यावेळी हजारो उमेदवार उपस्थित होते.

माहिती तंत्रज्ञान, बी.पी.ओ., सेवा क्षेत्र, एच.आर., विपणन, विक्री, बँकिंग, फायनान्स विमा, अन्य वित्तीय संस्था, वस्त्रोद्योग, टेलिकॉम, अभियांत्रिकी, आदींसह रिक्रुटिंगच्या क्षेत्रांत काम करणाऱ्या सुमारे १२२ कंपन्यांनी विविध ९,५३९ पदांसाठी उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. काही कंपन्यांनी लेखी तसेच ऑनलाइन परीक्षाही घेतल्या. या पदांसाठी यापूर्वीच दहा हजारांहून अधिक उमेदवारांनी ऑनलाइन व ऑफलाइन नावनोंदणी केली होती. सकाळपासूनच विद्यापीठाच्या लोककला केंद्रात स्पॉट नोंदणीसाठी उमेदवारांच्या रांगा लागल्या होत्या. त्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने ५० नोंदणी कक्ष सुरु केले होते. मेळाव्यासाठी एकूण २३ हजार ७६९ उमेदवारांनी नोंदणी केली. नोंदणी केलेल्या उमेदवारांना विविध कंपन्या व त्यांच्या मुलाखत कक्षाची माहिती पत्रकाद्वारे तसेच ठिकठिकाणी माहिती फलकांद्वारे उपलब्ध करून दिल्यामुळे त्यांना थेट मुलाखतीच्या ठिकाणी जाता आले. रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, वनस्पतीशास्त्र, भूगोल, मानव्यविद्या इमारत, वि.स. खांडेकर भाषा भवन, गणित आणि तंत्रज्ञान अशा नऊ विविध अधिविभागांमध्ये विविध कंपन्यांसाठी क्षेत्रनिहाय मुलाखतीची व्यवस्था केल्यामुळे एकाच ठिकाणी गर्दी न होता रोजगार मेळाव्याची प्रक्रिया सुरळीत पार पडली. त्याचप्रमाणे लोककला केंद्रात ३० विविध संस्थांनी स्टॉल्स उभारून सुमारे ६५०० उमेदवारांना विविध ५० कौशल्यांचे मोफत प्रशिक्षण दिले.


कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते रोजगार व कौशल्य महामेळाव्याचे फीत कापून उद्घाटन झाले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. ए. एम. गुरव, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. भारती पाटील, डॉ. गजानन राशिनकर यांच्यासह अधिसभा, व्यवस्थापन परिषद व विद्या परिषदेचे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

### मुलींचा सहभाग लक्षणीय

मेळाव्यात सहभागी झालेल्या उमेदवारांमध्ये मुलींची संख्या लक्षणीय होती. ग्रामीण भागातून मोठ्या संख्येने मुली मुलाखतीसाठी आल्या होत्या. मास्टर्स डिग्री ते डिप्लोमा अशी शैक्षणिक पात्रता असलेल्या तरुणींनी मेळाव्यामध्ये आत्मविश्वासाने मुलाखती दिल्या.

| २३,७३९ | १२२ | १७,२६९ | ९५३९ | ३,९३६ | १६९८ |
|---|---|---|---|---|---|
| नोंदणी केलेले उमेदवार | मेळाव्यात सहभागी कंपन्या | उमेदवारांनी दिल्या मुलाखती | रोजगाराच्या संधी | पुढील फेरीसाठी मुलाखत | उमेदवारांना ऑफर लेटर |

“



अनेकदा शैक्षणिक पात्रता असूनही नोकऱ्या कुठे उपलब्ध आहेत याची माहिती पोहोचत नाही. त्यामुळे नोकरीपासून वंचित राहावे लागते. मेळाव्यामुळे माहितीचा संग्रह उपलब्ध झाला.

- श्रीकांत माळी, कलाशाखा विद्यार्थी



मुलाखत देताना थोडे दडपण होते. फ्रेशर असूनही कंपन्यांच्या प्रतिनिधींच्या सहकार्यामुळे मुलाखत चांगल्याप्रकारे पार पडली. नोकरीसाठी मुलाखतीला जाताना नेमकी काय तयारी करावी, याची सखोल माहिती मिळाली.

- प्राची कुलकर्णी, रसायनशास्त्र विद्यार्थिनी



महारोजगार मेळाव्यासाठी महिनाभर आधीपासून तयारी सुरू होती. आमच्याकडे आधीच उमेदवारांची माहिती उपलब्ध झाल्याने उमेदवार निवडणे सोपे झाले. चांगले संभाषण कौशल्य, विषयाचे सखोल ज्ञान असल्यास नोकरी मिळवणे सहजसोपे आहे.

- प्रवीण कुंभोजकर, कंपनी प्रतिनिधी



ग्रामीण भागातून मुलाखतीसाठी येणाऱ्या मुलींमध्ये काही प्रमाणात गोंधळलेली अवस्था असते. अशावेळी पालक या नात्याने आम्ही त्यांच्यासोबत येण्यास प्राधान्य दिले. एवढ्या मोठ्या प्रमाणात नोकरीच्या संधी एकाच छताखाली मिळाल्याने त्याचा फायदा तरुणांना नक्कीच होईल.

- अर्जुन घुले, पालक, मौजे सांगाव